# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 17 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## **आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

## **प्रादेशिक बातम्या**

## **दिनांक १७ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.**

****

राज्य विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी विधानसभेत बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगच्या सरपंचाचं हत्या प्रकरण आणि परभणी इथल्या हिंसाचाराचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. यासंदर्भातला स्थगन प्रस्ताव काँग्रेसच्या नितीन राऊत यांनी मांडला त्याला नाना पटोले यांनी अनुमोदन दिलं. हा विषय गंभीर असून, त्यावर उद्या नियम १०१ अन्वये चर्चा घेण्याचं अध्यक्षांनी जाहीर केलं.

बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनीही मस्साजोगच्या संरपंचाच्या हत्येचा मुद्दा उपस्थित केला. आरोपीला अजुनही अटक झाली नसल्यावरुन त्यांनी टीका केली. आरोपीचं नाव सांगून त्यांनी, बीड जिल्ह्यातल्या गुन्हेगारीला आळा घालण्याची सरकारला विनंती केली. या प्रकरणातल्या मुख्य आरोपीला अटक झाली नाही तर आंदोलनाचा इशारा क्षीरसागर यांनी दिला. या विषयावर सरकार गंभीर नसल्याचा आरोप करत विरोधकांनी सभात्याग केला.

केजच्या आमदार नमिता मुंदडा यांनी यासंदर्भात बोलताना, सगळ्या सात आरोपींना पकडून फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली.

****

दरम्यान, विधानसभेत तालिका अध्यक्ष म्हणून विजय रहांगडाले, रमेश बोरनारे, शेखर निकम आणि दिलीप सोपल यांची नियुक्ती केल्याचं अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी जाहीर केलं. सभागृहाचे माजी सदस्य आणि मंत्री दत्तात्रय राणे यांच्या निधनाबद्दल सभागृहात त्यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.

****

मुंबई मध्ये झालेल्या तीन दिवसीय विशेष अधिवेशनात राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानणारा प्रस्ताव भाजपाचे पराग

आळवणी यांनी विधानसभेत मांडला. राज्याची प्रगती साधणारं सरकार जनतेनं यावेळी निवडलं, असं ते म्हणाले. राज्यात आधी २०१४ ते २०१९ दरम्यान फडणवीस आणि नंतर शिंदे सरकारच्या अडीच वर्षांच्या काळात उद्योग वाढीसाठी विशेष प्रयत्न करण्यात आले, या सरकारने महिलांसाठी देखील अनेक चांगल्या योजना सुरू केल्याचं आळवणी यांनी सांगितलं. राष्ट्रवादी काँग्रेसचे चेतन तुपे यांनी या प्रस्तावला अनुमोदन दिलं.

****

विधान परिषदेच्या सभापती पदाची निवडणूक परवा १९ डिसेंबरला होणार आहे. उपसभापती निलम गोर्हे यांनी आज ही घोषणा केली. उद्या १८ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

दरम्यान, परभणी आणि बीड प्रकरणात सरकारची भूमिका गुन्हेगारांना वाचवण्याची असल्याचा आरोप करत, महाविकास आघाडीतर्फे अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधिमंडळ परिसरात निषेध मोर्चा काढण्यात आला. यावेळी विरोधकांनी विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या नेतृत्वात महायुती सरकार विरोधी घोषणाबाजी केली.

****

राज्यसभेत संविधानावरची चर्चा आज पुन्हा सुरु झाली. सभागृह नेते, केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांनी यावर बोलताना, भारत ही केवळ सर्वात मोठी लोकशाही नसून लोकशाहीची जननी असल्याचं नमूद केलं. भारतीय आचार विचारानुसार लोकशाहीमध्ये स्वातंत्र्य, समता आणि सर्वसमावेशकता यांचा समावेश होतो, ज्यामुळे नागरिकांना सन्मानपूर्वक जीवन जगता येतं, असं सांगून नड्डा यांनी, सरकार या दृष्टीकोनासाठी समर्पित असून, भारतीय संविधानाला आकार देणाऱ्या संविधान सभा सदस्यांचे देश ऋणी असल्याचं सांगितलं.
दरम्यान, या चर्चेला आज पंतप्रधान नरेंद्र मोदी उत्तर देणार आहेत.

****

एक राष्ट्र एक निवडणूक विधेयक लोकसभेत सादर झालं. कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी हे विधेयक मांडलं. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, तसंच समाजवादी पक्षाने या विधेयकाला विरोध दर्शवला. तर शिवसेना, तेलगु देसम पक्षांनी या विधेयकाला पाठिंबा दिला.

****

राज्यातल्या राष्ट्रीय महामार्ग ६३ वरील जावळे–बोरगाव काळे विभागापासून ३७ किलोमीटर मार्गाच्या पेव्हड शोल्डरसह फोर–लेन पुनर्वसन आणि अद्ययावतीकरणासाठी ५७४ कोटी १८ लाख रुपयांसह मंजुरी देण्यात आली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी सामाजिक माध्यमावर ही माहिती दिली. मुंबई, पुणे, नागपूर, नांदेड, उदगीर आणि लातूर या प्रमुख शहरांना जोडण्यासाठी, तसंच कृषी मालाची वाहतूक आणि व्यावसायिकांसाठी देखील हा मार्ग महत्त्वपूर्ण असल्याचं गडकरी यांनी सांगितलं.

****

आपल्याला मंत्रिपदाचा प्रश्न नसून, आपली अवहेलना करण्यात आल्याचं, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे. भुजबळ यांना मंत्रिपद मिळालं नसल्याबद्दल त्यांच्या नाराज कार्यकर्त्यांच्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. आपल्या मतदारसंघात जाऊन, नागरीक, कार्यकर्त्यांशी चर्चा करुन पुढील भुमिका जाहीर करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

****

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी येत्या २५ जानेवारी पासून पुन्हा उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. जालना जिल्ह्यातल्या आंतरवाली सराटी इथं ते आज वार्ताहरांशी बोलत होते.

****